# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/बातमी-कार्यशाळा/हस्तदेय/२०१९ दि.३१ ऑगस्ट,२०१९

जळगाव दि.३१ ( ) विद्यापीठाने आपणास दिलेल्या संधीचा जास्ती जास्त उपयोग करून आपल्या अध्ययन आणि अध्यापन या उपक्रमात वक्तिगत क्षमता विकासाचा अंतर्भाव करुन विद्यार्थ्यांना लाभ द्यावा, असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्षमता विकास केंद्रातर्फे विद्यापीठातील नवनियुक्त सहायक प्राध्यापकांसाठी “ इंटरअॅक्टीव्ह टिचिंग विथ आयसीटी ” या विषयावरील क्षमता विकास या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.३१ ऑगस्ट रोजी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रा.ए.बी. चौधरी बोलत होते. क्षमता विकास केंद्राचे समन्वयक प्रा.एम.एम.महाजन यांनी आपल्या प्रास्तविकात कार्यशाळेच्या आयोजनाबाबत भूमिका विषद केली आणि भविष्यात या केंद्राद्वारे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

या कार्यशाळेसाठी युरोपियन युनिर्व्हसिटीज मधून प्रशिक्षण घेतलेले तज्ञ प्रशिक्षक प्रा.भुषण चौधरी यांनी परस्पर अध्ययन या विषयावर तर डॉ. राम भावसार यांनी शिक्षणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची क्षमता वाढवून त्याचा उपयोग करणे या विषयांवर मार्गदर्शन केले.

---

जा.क्र.:कबचौउमवि/१६/बातमी-कार्यशाळा/हस्तदेय/२०१९ दि.३१ ऑगस्ट,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचोउमवि/१६/रासेयो-वृक्षारोपण/हस्तदेय/२०१९ दिनांक: ३१ ऑगस्ट,२०१९

जळगाव दि.३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे विद्यापीठाच्या परिसरात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यापीठातील रासेयोनेच्या पदवी व पदव्युत्तर विभागाच्या एकाकातील गणित व संख्याशास्त्र प्रशाळा, भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र. व्यवस्थापन प्रशाळा, युआसीटी प्रशाळेच्या रासेयो स्वयंसेवकांनी विद्यापीठातील विद्यार्थी भवन, विद्यार्थिनी वसतिगृह, विद्यापीठ अतिथीगृह, शिक्षक भवनाच्या परिसरात ३०० वृक्षांची लागवड केली. यावेळी विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ.पंकज नन्नवरे, विद्यापीठ एककाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील कुलकर्णी, डॉ. चिंतामण आगे, डॉ.पवित्रा पाटील यांच्यासह कुलगुरु व कुलसचिव कार्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

---

जा.क्र.:कबचोउमवि/१६/रासेयो-वृक्षारोपण/हस्तदेय/२०१९ दिनांक: ३१ ऑगस्ट,२०१९

प्रति,<br>
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमीस प्रसिध्दी द्यावी, ही सविनय विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी